महाराष्ट्र शासन

क्रमांक:-एसएसएन-१०९५/५८४७/माशि-१.
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक- २८ नोव्हेंबर, १९९५.

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग.

विषय:-१९९४-९५ या वर्षी परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळेच्या आदेशाचे १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून नूतनीकरण करण्याबाबत..

संदर्भ:- शासनाचे क्रमांक-एसएसएन-१०९४/५११५/माशि-१ दिनांक- २.११.९४ चे पत्र

संदर्भाधिन पत्रान्वये साने गुरुजी शिक्षण संस्था, हडपसर जि.पुणे या संस्थेस हडपसर परीसर जि.पुणे येथे नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात आली होती. तथापि, परवानगीचे आदेश उशिरा मिळाल्याने विद्यार्थी संख्येअभावी संस्थेस त्यावर्षी शाळा सुरु करता आली नाही. याबाबत क्र. माध्य.३/मा/ [१४] नुतनीकरण/ पुवि/९५ दि .२०.१०.९५ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या अहवालातील माहिती विचारात घेऊन सदर संस्थेस सन १९९४-९५ या वर्षी माध्यमिक शाळा सुरु करण्यास दिलेल्या परवानगी आदेशाचे नूतनीकरण करुन "जुन १९९४ ऐवजी" जुन १९९५ पासून त्याच ठिकाणी शाळा सुरु करण्यास शासनाच्या उपरोक्त दि. २.११.९४ च्या पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर या आदेशान्वये शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही कृपया तात्काळ करावी.

[ र.का. कुमारे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जि.प.पुणे.
३. सचिव, साने गुरुजी शिक्षण संस्था, हडपसर, जि.पुणे.
४. निवड नस्ती [२ प्रती]